# तंत्रज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणारी 'डॉल्फिन युनिसिस'

- पल्लवी मुजुमदार

**डॉल्फिन युनिसिस प्रा.लि. ही कंपनी 'क्लाऊड कॉम्प्युटिंग'वर आधारित वेब ई.आर.पी. सॉफ्टवेअर सोल्यूशन तयार करण्याचे महत्त्वपूर्ण काम करते. सर्वसामान्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचावे या उद्देशाने पुष्कर मंत्री यांनी या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. उद्योगात, संस्थेत, कचेरीत प्रत्येक कामाचे व्यवसायानुरूप सोप्या पद्धतीने संगणकीकरण करण्याचे काम डॉल्फिन युनिसिसद्वारे केले जाते.**

सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात कोणताही छोटा वा मोठा व्यवसाय असो, बँकिंग क्षेत्र असो किंवा वस्तू उत्पादन करणारा कारखाना असो, त्याच्या संचलनासाठी संगणकीकरणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे केवळ माहिती अद्ययावत राहते, एवढेच नाही तर उत्पादन खर्चाची व मनुष्यबळाची बचत होते व त्यामुळे उत्पादन स्पर्धात्मक पद्धतीने ग्राहकांपर्यंत पोहोचू शकते. याबाबतीत उद्योगांना/संस्थांना तांत्रिक मदत करणाऱ्या ज्या संस्था आहेत, त्यामध्ये ठळकपणे झळकणारे एक नाव म्हणजे 'डॉल्फिन युनिसिस प्रा.लि.'

डॉल्फिन युनिसिस प्रा.लि. ही कंपनी 'क्लाऊड कॉम्प्युटिंग'वर आधारित वेब ई.आर.पी. सॉफ्टवेअर सोल्यूशन तयार करण्याचे महत्त्वपूर्ण काम करते. २३ एप्रिल २०१३ रोजी कंपनीची स्थापना झालेली असली तरी 'डॉल्फिन संगणक व्यवस्थापन' या नावाने १९९६ सालापासून कंपनीचे अध्वर्यू पुष्कर मंत्री माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत आहेत.



**संचालक पुष्कर मंत्री, सोबत संचालिका हंसा मंत्री**

सर्वसामान्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचावे या उद्देशाने पुष्कर मंत्री यांनी या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. उद्योगात, संस्थेत, कचेरीत प्रत्येक कामाचे व्यवसायानुरूप सोप्या पद्धतीने संगणकीकरण करण्याचे काम डॉल्फिन युनिसिसद्वारे केले जाते.

संगणकीकरण करण्यापूर्वी कंपनीचे उत्पादन कोणते आहे, ते तयार करण्याची प्रक्रिया, ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची पद्धत, विपणन, कर्मचारी, पुरवठादार-ग्राहक यांची साखळी, कंपनीचे उद्दिष्ट आणि या सगळ्याची नोंदपद्धती (डॉक्युमेंटेशन) या सगळ्याचा सखोल अभ्यास डॉल्फिन युनिसिसचे पुष्कर मंत्री आणि त्यांची टीम करते. हे तयार केल्यानंतर कंपनीला कशा प्रकारे उपयुक्त सॉफ्टवेअर बनवता येईल, त्याचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात येतो आणि त्या पद्धतीने संस्थेच्या मागणीनुसार संगणकीकरण पार पडते. हा प्रस्ताव तयार करताना संबंधित संस्थेचे ध्येय, उद्दिष्ट व मूल्ये यांचा विचार केला जातो.

आज अनेक शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये, प्रकाशन संस्था, सल्लागार तसेच सामाजिक संस्था डॉल्फिन युनिसिसचे ग्राहक आहेत.

ग्राहकांचे अकाउंट्स, अर्थ, उत्पादन आणि साठा यासाठी 'हिशेबनीस' हे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेंटसाठी 'जे-सियाराम', रिअल इस्टेट मार्केटिंगसाठी 'रेमा', गुंतवणूक सल्लागारांसाठी 'GK साथी' अशी डॉल्फिन युनिसिसची विविध सॉफ्टवेअर्स उत्पादने बाजारात उपलब्ध आहेत. प्रकाशन व्यावसायिकांच्या गरजा लक्षात घेऊन 'प्रकाशक हिशेबनीस' हे सॉफ्टवेअर बनवण्यात आलेले आहे. हे सॉफ्टवेअर म्हणजे प्रकाशकांचा एक सच्चा सहकारी म्हणूनच गणले जाते, असा डॉल्फिन युनिसिसच्या ग्राहक प्रकाशकांचा अनुभव सांगतो. याचबरोबर डॉल्फिन युनिसिसचे अतिशय लोकप्रिय

सॉफ्टवेअर म्हणजे 'ग्रंथालय मदतनीस'. ग्रंथालयाचा सर्वांगीण विकास हे उद्दिष्ट ठेवून तयार केलेले असे हे सॉफ्टवेअर आहे, असे डॉल्फिन युनिसिसच्या संचालिका हंसा मंत्री नमूद करतात. प्रादेशिक भाषेत संगणकीकरण करताना हे सॉफ्टवेअर ग्रंथालयांना अतिशय उपयुक्त ठरते. दादर सार्वजनिक वाचनालय, लोकमान्य सेवा संघ, महाराष्ट्र सेवा संघ (मुलुंड) हे डॉल्फिन युनिसिसच्या मान्यवर ग्राहकांच्या यादीत आहेत. अगदी अलीकडेच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात 'ग्रंथालय मदतनीस'ने काम सुरू केले, हा आनंदाचा क्षण असल्याचे हंसा मंत्री म्हणतात. त्याचबरोबर लहान ग्रंथालयांसाठी उपयुक्त होईल असे 'विशेष ग्रंथालय पॅकेज' डॉल्फिन युनिसिसने १ मेपासून बाजारात आणले आहे, तेसुद्धा नक्कीच लोकप्रिय होईल, असा डॉल्फिन युनिसिसच्या टीमला विश्वास आहे.

या टीममध्ये संचालक पुष्कर मंत्री, संचालिका हंसा मंत्री यांच्याबरोबर तंत्रज्ञान क्षेत्रातील पदवीप्राप्त, MBA अशी तगडी सहकारी टीम आहे. उत्पादनात आणखी काही उत्तमता कशी साध्य करता येईल, या दृष्टीने सतत कृतिशील असलेला असा डॉल्फिन युनिसिसचा R & D विभाग आहे. मुळात सॉफ्टवेअर विकसित झाल्यानंतर काम संपत नाही, तर सतत नवनवीन संकल्पना राबवून ग्राहक ऑर्गनायझेशनच्या उन्नतीकरता आम्ही बांधील असतो, असे पुष्कर आणि हंसा मंत्री आवर्जून नमूद करतात.

बल्क ई-मेल, एस.एम.एस., Virtual Private Server, Virtual Dedicated Server या सॉफ्टवेअरबरोबरच उद्योगाचे विस्तारीकरण करत आता डॉल्फिन युनिसिसने संगणक हार्डवेअर, सिक्युरिटी सिस्टिम, बारकोड, ऑप्टिकल मार्क रेकग्निशन या क्षेत्रातही पदार्पण केले आहे.

''अत्युत्तम ग्राहक सेवा पुरवत उत्कृष्ट सर्व्हिस पॅटर्न तयार करत जगभरातील ५०,०००पेक्षा जास्त ग्राहकांना सेवा पुरवणारी कंपनी असा आमचा लौकिक असेल. अर्थात ध्येय साध्य करण्यासाठी अनेक लोकांना सहभागी करून घ्यावे लागणार आहे'' असे डॉल्फिन युनिसिसची टीम अभिमानाने सांगते.

'टेक्नॉलॉजी फॉर ऑल' या ब्रीदवाक्याला जागत कार्य करणाऱ्या डॉल्फिन युनिसिस प्रा. लि.च्या प्रादेशिक भाषेत संगणकीकरण, सर्वसामान्यांची प्रगती या उद्दिष्टासाठी शुभेच्छा!

dolphin UNISYS TM
Technology for All
www.dolphinunisys.com

**pallav.mujumdar@gmail.com**

## आवाहन

आतापर्यंत 'वाचकपीठ' या उपक्रमाला वाचकांनी उत्तम प्रतिसाद दिला. या मनःपूर्वक प्रतिसादाबद्दल वाचक-लेखकांचे आभार...वाचकपीठासाठी पुढचा विषय आहे...**'माणुसकीचे झरे..'**

आपल्याला आठवत असेल की सा. विवेकच्या १७ मार्च २०१३च्या अंकात कला हळदीकर यांचा **'सामान्यातील असामान्य'** हा लेख प्रसिद्ध केला होता. आयुष्याच्या एखाद्या वळणावर काही अपरिचित व्यक्ती आपल्याला भेटतात आणि त्यांनी घडवलेल्या माणुसकीच्या मनोज्ञ दर्शनाने कायम आपल्या मनात घर करून राहतात. आयुष्याकडे बघायची नवी दृष्टी आपल्याला देऊन जातात. प्रत्येक संवेदनशील व्यक्तीकडे अशा आठवणींची पुंजी असते. यातली एखादी माणुसकीच्या जिवंत झऱ्याचं सुखद दर्शन घडविणारी आठवण किंवा एखादा प्रसंग आपल्या वाचकांना सांगायचा आहे. ***ही आठवण अपरिचित व्यक्तीच्या संदर्भातली हवी, याची कृपया नोंद घ्यावी.***

३५० ते ५०० शब्दांत (फुलस्केपची दोन पानं) आमच्याकडे १६ जून २०१३ पर्यंत लिहून पाठवावे. पोस्टाने वा कुरियरने वा ई-मेलद्वारा किंवा फॅक्सद्वारा **(vivekedit@gmail.com, फॅक्स - ०२२-२४३६३७५६)** हे लेखन पाठवावे. पत्र किंवा ई-मेल करताना, दिलेल्या विषयाचा स्पष्ट उल्लेख करावा, सोबत पत्ता (संपर्क क्रमांकासह) व आपले छायाचित्र पाठवावे. **आलेल्या लेखांमधून निवड करण्याचे अधिकार निवड समितीला असतील, याची कृपया नोंद घ्यावी.**

नेहमीप्रमाणेच तुम्ही मनःपूर्वक प्रतिसाद द्याल, तुमच्या अनुभवाने आम्हांलाही समृद्ध कराल याची खात्री आहे. प्रतीक्षेत...

